Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ५३ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.१४ नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# नको असलेले मूल कुठेही टाकून देऊ नका

## महिला व बालविकास विभागाचे आवाहन; १०९८ टोल फ्री क्रमांकाला संपर्क साधा

**चंद्रपूर–नको असलेली गर्भधारणा झाली आणि गर्भपातही करता आला नाही, तर मग जन्माला आलेल्या मुलाचे काय करायचे, असा विचार करून ते बेवारस ठिकाणी सोडून दिले जाते. मात्र असे न करता संबंधित जन्माला आलेल्या अर्भकांना सुरक्षित निवारा प्रशासनाकडून देण्यात येतो. त्यामुळे नको असलेले मूल टाकून देऊ नका, असे आवाहन महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे. तसेच याबाबत टोल फ्री क्रमांक १०९८ वर संपर्क साधावा, असेही विभागाने म्हटले आहे. जिल्ह्यात महिला व बालविकास विभाग, बालकल्याण समिती, किलबिल दत्तक संस्था, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड हेल्पलाईन यांच्यासह पोलिस विभाग, आरोग्य विभाग अशा सर्व यंत्रणांकडून नवजात अर्भकांना सुरक्षित स्थळी ठेवण्याचे काम करण्यात येते.**

शहरासह जिल्ह्यात सार्वजनिक, तसेच बेवारस ठिकाणी नवजात अर्भक सापडल्याचे प्रकारही मागील काही वर्षांत घडले आहेत. अशा प्रकरणांमध्ये पोलिसांनी गुन्हेसुद्धा दाखल केले आहेत.नको असलेले मूल जन्माला आले तर : प्रत्येकाला जगण्याचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे एखाद्या घटनेत मूल नको असल्यास व जन्म द्यावा लागला व त्यानंतर पालनपोषण करण्यास असमर्थ असल्यास संबंधितांनी त्याबाबतची माहिती हेल्पलाईनच्या १०९८ या टोल फ्री क्रमांकावर तसेच पोलिस यंत्रणेला द्यावी. यामध्ये संबंधिताचे नाव गोपनीय ठेवले जाते.

येथे संपर्क करा :

जिल्हा बाल संरक्षण कक्ष : जिल्हा स्तरावर ही यंत्रणा कार्यरत असून नवजात बालकाची माहिती मिळाल्यास योग्य पुर्नवसन होईपर्यंत बालकासोबत काम करत असते.

चाईल्ड हेल्पलाईन : १०९८ या क्रमांकावर माहिती दिल्यास संबंधिताचे नाव गोपनीय ठेवले जाते. बालकल्याण समितीला माहिती देऊन पुढील कारवाही चाईल्ड हेल्पलाईन करीत असते.

बालकल्याण समिती : जिल्हा स्तरावरील बालकल्याण समितीला माहिती दिल्यास समितीच्या आदेशान्वये पुढील कारवाही करून त्या नवजात बाळाला ताब्यात घेतले जाते.

पोलिस विभाग : जिल्ह्यात जिवंत अर्भक सापडल्याचा घटनांमध्ये अज्ञात महिला, मातेविरुद्ध यापूर्वी अनेक प्रकरणांमध्ये गुन्हाही दाखल केला आहे. 'अर्भक मृत' आढळल्यास याबाबतसुद्धा गुन्हा दाखल केला जातो.

बाल कल्याण समिती घेते काळजी : नको असलेले मूल जन्माला आल्यानंतर त्याला टाकून देण्याऐवजी बालकल्याण समितीकडे संपर्क साधावा. समिती सर्व अर्भकांना सुरक्षित ठेवते.

महिला हेल्पलाईन (१०९१): बेवारस बाळ आढल्यास महिला हेल्पलाईनलासुद्धा माहिती देता येते. हेल्पलाईनचे सदस्य पोलिसांच्या मदतीने बाळाला ताब्यात घेऊन प्रक्रिया करतात.

पोलिसांचा भरोसा सेल : प्रत्येक पोलिस ठाण्यात भरोसा सेलची स्थापना करण्यात आली आहे. या सेलकडेही अशा घटना संदर्भात माहिती देता येते.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत, बालकल्याण समितीच्या अध्यक्षा क्षमा बासरकर, सदस्या ज्योत्स्ना मोहितकर, अमृता वाघ, वनिता घुमे, सर्व पोलीस स्टेशन, बाल पोलिस पथक, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय साखरकर, किलबिल प्राथमिक बालगृह दत्तक संस्था सरचिटणीस प्रभावती मुठाळ, हेमंत कोठारे, उपाध्यक्षा वंदना खाडे, सदस्या शीतल गौरकार, चाईल्ड हेल्पलाईनचे प्रकल्प समन्वयक अभिषेक मोहूर्ले, अंगणवाडी सेविका आदी जिल्ह्यातील बालकांचे पुनर्वसन करीता महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात, असे महिला व बालविकास विभागाने कळविले आहे.

# वंचितांची दिवाळी उपक्रम

## काँग्रेसचा वंचितांना मदतीचा हात

### कोर्टीमत्ता येथे वंचितांना दिवाळीनिमित्त रवा, साखर वाटप

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

काँग्रेसने नेहमी गरिबांना साथ दिली आहे. विविध योजना त्यांचेसाठी चालू केल्या व त्या आजही सुरु आहे. त्या योजनांचा लाभ सर्वांना होत आहे. आम्ही सदैव आपल्या सोबत असून काॅग्रेसचा हात गरिबांसोबत असल्याचे प्रतिपादन काँग्रेसचे नेते कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिनेश चोखारे यांनी केले.

दिवाळी हा सण सर्वांसाठी आनंद आणि उत्साहाचा असतो. मात्र, काही वंचित घटकांना दिवाळीचा आनंद घेता येत नाही. यासाठी दिनेश दादापाटील चोखारे यांच्या वतीने शनिवार, दिनांक ११ नोव्हेंबर २०२३ रोजी वंचितांची दिवाळी या उपक्रमांतर्गतउपक्रमांतर्गत रवा व साखर वाटप करण्यात आले. कोर्टीमत्ता या गावात दिवाळीच्या निमित्यानेआयोजित रवा साखर वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बल्लारपूर नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष घनश्याम मुलचंदानी उपस्थित होते.यावेळी तालुकाअध्यक्ष गोविंदा पाटील उपरे, ओबीसी नेते सचिन राजूरकर,बल्लारपूर नगर परिषदेचे माजी सदस्य भास्कर माकोडे, सुरेश वासाडे, अल्पसंख्याक आघाडीचे तालुकाध्यक्ष असीम खान, सुरेश भप्पनवार, कोर्टीमत्ताचे माजी उपसरपंच दिलीप भोयर, ग्रामपंचायतचेसदस्य मनोज सोयाम, ग्रामपंचायतचेसदस्यामंदा मडावी, ग्रामपंचायतचेसदस्यावर्षा भोयर, यांची उपस्थितीहोती.या कार्यक्रमात चोखारे म्हणाले की, दिवाळी हा सण सर्वांसाठी आनंददायी असतो. मात्र, काही वंचित घटकांची दिवाळी गोड झाली पाहिजे यासाठी मी हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत वंचित घटकांना साखर वाटप



करण्यात आली आहे. यामुळे त्यांना दिवाळीचा आनंद घेता येईल.त्यासोबतआमचा उद्देश हा सर्वाना सोबत घेऊन चालणे हाच आहे. गोरगरीबानावेळोवेळी साथ देणे हाच मुख्य हेतू ठेऊन काँग्रेस समोर जात आहे. आपणकाँगेससोबत उभे राहावे, असे आवाहन करत काँग्रेस ची सत्ता असतानाच्या विविध योजनांचा आजही आपणास फायदा होत आहे. आम्ही आपल्या सोबत आहोत असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळीघनश्याम मुलचंदानीयांनी अध्यक्षयीयमनोगत व्यक्त करताना म्हटले कि, काँग्रेस नेहमी सर्वांचे मदतीला धावून आली आहे. पक्ष्याचे ध्येय धोरण सागंताना ते म्हणले कि, काँगेसने सुरुवातीपासूनच देशातील सर्व जनतेसोबत खंबीर उभे राहून त्यांना सहकार्य केलेआहे.कायक्रमाचे प्रास्ताविक व संचालनतालुकाअध्यक्षगोविंदा पाटील उपरे यांनी केले.या कार्यक्रमात कोर्टीमत्ता, कोर्टि तुकुम, कोर्टीमत्ता नविन गावातील शेकडोगावकऱ्यांना साखर वाटप करण्यात आली. या कार्यक्रमामुळे वंचित घटकांना दिवाळीचा आनंद घेता आला.

# वरोरा शहरात भगवान शंकराच्या मूर्तीची विटंबना

## विटंबना करणाऱ्याचा शोध घेवून त्वरित अटक करा–हिंदू संघटनांची मागणी



**वरोरा । प्रतिनिधी**

शहरातील उड्डाणपुलाच्या बाजूला स्मशान भूमीत असलेल्या भगवान शंकराच्या मूर्तीची विटंबना झाल्याची घटना १३ नोव्हेबर रोज सोमवारला सकाळी उघडकीस आली.

वरोरा शहरात गेल्या दोन वर्षात यापूर्वी अश्या प्रकारच्या दोन घटना घडल्या असून ही तिसरी घटना आहे.या घटनेच्या मागे शहरातील सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करण्याला शोधून त्वरित अटक करावी अशी मागणी विविध संघटनांच्या माध्यमातून पोलिसांना करण्यात आली .तसेच येत्या २४ तासात सदर आरोपीला अटक करा अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशारा ही निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला आहे . सदर निवेदनाची प्रत मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य , गृहमंत्री महाराष्ट्र राज्य, पालकमंत्री चंद्रपूर जिल्हा , पोलीस अधीक्षक चंद्रपूर यांना ही पाठविण्यात आली आहे . यावेळी समस्त हिंदू सकल समाज,श्रीराम जन्मोत्सव समिती,श्री शिवप्रतिष्ठान प्रतिष्ठान वरोरा, विश्व हिंदू परिषद वरोरा,बजरंग दल वरोरा, शिवशाही युवा मंच वरोरा, हिंदू युवा भारत संघटना, शिवशंभू ग्रुप वरोरा, या संघटनांचे पदाधिकारी तसेच गावातील हिंदु समाज बांधव उपस्थित होते

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुल तालुका उपाध्यक्षपदी महेंद्र गोगले यांची निवड



**मूल । प्रतिनिधी**

येथील सामाजिक कार्यकर्ते महेंद्र गं. गोगले यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका उपाध्यक्ष म्हणुन तालुकाध्यक्ष मंगेश पोटवार यांनी नियुक्तीपत्र देऊन निवड केली आहे.

सर्वसामान्य माणसाचे प्रश्न समजून घेण्याची आणि सोडवण्याची धमक असलेला कार्यकर्ता म्हणून महेंद्र गोंगले यांची ओळख आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष मंगेश पोटवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांच्या मान्यतेने त्यांच्यावर मूल तालुका उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष नामदार अजित दादा पवार यांचा वसा विकासाचा आणि विचार बहुजनाचा हा संदेश ग्रामीण भागातील लोकांपर्यंत नेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून लोकांचे प्रश्न मार्गी लावून विधायक कामे करण्याचा संकल्प कार्यकर्त्यांनी करावा.असा आशावाद तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार यांनी व्यक्त केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर अध्यक्ष आकाश येसनकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे रोहित कामडे उपस्थित होते.

महेंद्र गोंगले याच्या नियुक्तीबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत असून आनंदराव गोहने, ईश्वर जराते, भावेश रामटेके, मुकेश रामटेके, आकाश गोंगले यांनी अभिनंदन केले आहे.

# सुधीर मुनगंटीवार सेवाकेंद्राच्या वतीने दिवाळी फराळवाटप

## देवराव भोंगळे यांच्यामुळे गोरगरिबांची दिवाळी गोड



**आपल्या घरी गोडधोड व्हावे, नातेवाईकांना फराळ द्यावा असे प्रत्येक कुटुंबाला वाटते परंतु, प्रत्येकाला हे शक्य होत नाही. आर्थिक विवंचनेने दिवाळीही साजरी करू न शकणारे अनेक कुटुंबे असतात. या कुटुंबांना मदत करण्यासाठी आम्ही काही भव्यदिव्य करीत नाही. एक दिवाळी फराळ देत आहे. यातून मात्र आम्हाला समाधान मिळते, त्यांच्या चेहऱ्यावरील समाधान हिच आमची दिवाळी भेट आहे. आमची दिवाळी अशीच गरिबांसोबत साजरी होते. गरिबांच्या घरातही दिवाळीच्या दिवसांमध्ये दिवा जळावा, अशीच मी नेहमी कामना करते.**

**:– देवराव भोंगळे, राजुरा विधानसभा प्रमुख**

**राजुरा । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी राजुरा विधानसभा जनसंपर्क कार्यालय व सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्र राजुराच्या वतीने शहरातील सोनिया नगर, रमाबाई नगर, बेघरवस्ती येथिल गोरगरिबांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी यासाठी त्यांच्या वस्तीवर जाऊन दिवाळी फराळाचे वाटप करण्याचा उपक्रम राजुरा विधानसभा निवडणूक प्रमुख देवराव भोंगळे यांनी राबविला आहे. या सामाजिक बांधिलकीचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

दिवाळी हा प्रकाशाचा हिंदू सण आहे, जो इतर रुपांत इतर भारतीय धर्मांमध्येही साजरा केला जातो. अंधारावर प्रकाशाचा, वाईटावर चांगल्याचा आणि अज्ञानावर ज्ञानाच्या विजयाचे प्रतीक म्हणून या सणाला ओळखतात. दिवाळीचा सण सर्वत्र मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात येत असला, तरी गोरगरीब कुटुंब या सणाच्या आनंदाला परिस्थितीअभावी पारखे होतात. हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे व वाढत्या महागाईमुळे संसाराचा गाडा ओढून नेणे हे त्यांच्या आवाक्या बाहेरचे असते. दिवाळीच्या आनंदाला हे गरीब लोक पारके होतात. अशा गरीब कुटुंबातील लहान मुले–मुली दिवाळीचा आनंद प्रत्यक्षात घेऊ शकत नाहीत. समाजातातील हे वास्तव चित्र नेहमीच पाहायला मिळतात. दिवाळीच्या आनंदाला बिकट आर्थिक परिस्थितीमुळे पारखे झालेल्या अशा गोरगरीब कुटुंबाच्या शहरातील रमाबाई नगर, सोनिया नगर, बेघरवस्तीवर जाऊन देवराव भोंगळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी गरीब कुटुंबे व त्यांच्या मुला–बाळांना दिवाळीच्या फराळाचे पॅकेट वाटप करून त्यांची दिवाळी गोड व आनंदी करण्याचां एक आदर्श उपक्रम सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्राच्या माध्यमातून राबवीण्यात आला आहे. राजुरा येथील गोरगरीब माता भगिनींना सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्र तथा विधानसभा जनसंपर्क कार्यालयात स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह दिवाळी फराळ वाटपाचे शुभारंभ राजुरा येथून केला असून गोंडपिपरी, गडाचांदुर, राजुरा येथे सुद्धा फराळ वाटप केला आहे. यावेळी भाजपाचे विनायक देशमुख, सचिन बैस, ड. नितीन वासाडे, सिनू पांझा, स्वरुपा झंवर, शितल वाटेकर, रेश्मा तोटावार, प्रियदर्शनी उमरे, योगीता भोयर, बाळकृष्ण भोंगळे, उमेश ठग, अमोल मोरे आदिंसह मोठ्या संख्येने माताभगीनी उपस्थित होत्या.

संपादकीय

# दिवाळीचं शास्त्र

अॅमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हल: मि. किचन आणि घरगुती उपकरणांवर ३५% सूट

'मेरी दिवाली आजो...' भारतातल्या आजोबांनी फोन उचलताच कॅलिफोर्नियातला नातू उत्साहाने म्हणाला. लगेच आजोबांनी फोनवरून त्याचा गालगुच्चा घेतल्याच्या थाटात म्हटले, 'ए लबाडा... नुस्ती तेरी का रे? दिवाळी आपल्या सगळ्यांचीच असते ना?'

'कम्मॉन आबा. मेरी ख्रिसमस असतो की नाही; तसंच मेरी दिवाली म्हणायला गेलेलो मी.'

'बबड्या, हे बघ, योग्य जागी योग्य शब्दच हवा, नाही का? मेरी ख्रिसमस ठीक आहे; पण दिवाळीला 'शुभ दीपावली' असंच म्हणायला हवं बरं. शास्त्र असतं ते. वाटल्यास, ही दिवाळी तुम्हाला भरभराटीची, उत्कर्षाची, झालंच तर आणखी कशाकशाची...'

'चिल आबू... तुमचं ते डिशनल समथिंग समथिंग होईपर्यंत आजुलीला बोलवा ना फोनवर.'

'ती दिवाळीच्या तयारीत बिझी आहे बाबा. पार्लरला गेलीये.'

'वॉव... दिवाळीला पार्लरला जायचं! शास्त्र असतं?'

'नाही; ती फॅशन असते. दिवाळीला नाकात नथ घालायची म्बिशन आहे ना तुझ्या आजीची! ऐन वेळी सुजून गोंधळ नको, म्हणून आधीच 'स्किन ट्रीटमेंट' घ्यायची म्हणत होती.'

'नथ सुजते हे मला माहीत नव्हतं आबुडी.'

'नाक सुजतं रे एकेकीचं. टोक बोचतं, नाही म्हटलं तरी!'

'लुक ट दॅट. नाकाचं टोक दुसऱ्यांना का बोचेल रे आजुड्या?' नातू खेळकर होता, म्हणजे आजोबांच्या नावाचे नाना खेळ करणारा. तो जन्मापासूनच कॅलिफोर्नियात राहणारा असला, तरी त्याची मम्मा (उर्फ ममडी, ममुली, मम्स, ममाई) ही खूपच 'होम सिक' झाली, की टीव्हीवर एक ना एक मराठी मालिका बघायची. त्यातले संवाद कानावर पडून पडून एकालाही धड नावाने हाक न मारण्याची, भल्या नावांचे भलतेच धिंडवडे काढण्याची सवय नकळतपणे नातवाला लागली होती. साधे 'आजोबा' म्हणताना कधी त्यातला 'जो' सायलेंट, कधी 'बा' सायलेंट, कधी नुसताच 'आजो', कधी 'आज्जड' असले सारे पर्याय तो वापरायचा. त्याला पहिल्यापासून नथ, नाक, टोक, झोक वगैरे संदर्भात स्पष्टीकरणे देण्याने आपल्या नाकी नऊ येतील, हे ओळखून आजोबा म्हणाले, 'तुमचं काय चाललंय शेठ?'

'टाइमपास. मॅम्स कुठं गेलाय?'

'मामा ना? गेला असेल धोतराची प्रॅक्टिस करायला.'

'रिअली? दिवाळीला धोतर? तेही शास्त्र असतं का?'

'नाही रे. तो फॅन्सी ड्रेस असतो.'

'ग्रेट. माझ्यापण पपड्यानं न्युअल पूजेला असलं भारी धोतर घातलेलं ना...'

'धोतर घालत नाहीत बब्बड; नेसतात. नाडीचं असेल, तर घालतातही म्हणा... असं लेंग्यासारखं वर ओढून...'

'ते वर-खाली एवढं डिटेल मी पाहिलं नाहीय सो फार; पण एक पाहिलंय. धोतर घालून पप्पड पाटावर बसलेला ना, तर उठताना एंटायर पाट सोबत घेऊनच उठलेला तो. धोत्रमध्ये पाय अडकलेला जाम. बॅड हॅबिट ना?'

'कोणाची? पपाची?'

'नाही हो, त्या धोतर स्टफची. वाटेत येणारं सगळं असं उचलत काय जायचं एखाद्यानं?'

'मामाला चांगलं वॉर्न करू या त्याबाबत. बाकी तुझं काय?'

'एंजॉइंग फराळ! ते तर पक्कंच शास्त्र असतं ना हो दिवाळीचं?'

'सोय असते, खरं म्हणशील तर.'

'सोय? फॉर व्हॉट?'

'अरे, इथं एवढे दिवाळी अंक निघतात. त्यात फराळावरचे विनोद, पानपुरकं लागतातच ना जागा भरवायला...'

'जोक्स? मला सांगा ना. मला हसायला खूप आवडतं.'

'ह्या ह्या... त्या जोक्सनं हसूबिसू येत नसतं रे; पण ते शास्त्रानुसार असावे लागतात. 'अरे वा! यंदा भुईचक्रं तळायला घेतली वाटतं,' असं नवऱ्यानं म्हटल्यावर डोळे वटारणाऱ्या बायकोचं चित्र दिसलं, की खुसूखुसू हसायचं. 'लाडवांबरोबर एकेक छोटा खलबत्ताही ठेव हं पाहुण्यांसमोर,' अशा चित्राला खोखो हसायचं. जमतं सवयीनं सगळं.'

'कालपासून मम्माई रांगोळीची सवय करतेय आबुड्या. तुझ्याकडं कोण बनवेल रांगोळी?'

'तुझी आज्जुली, मामी, तिची पोरगी सगळ्यांच बनवतील. टपाटप आयते छाप उठवायचे आणि हातानं काढली म्हणून सांगायचं. असलं वेगळंच शास्त्र डेव्हलप केलंय त्यांनी.'

'ग्रेय. सो, यू विल हॅव अ व्हेरी बिझी दिवाळी ना?'

'तर! दिवाळी म्हटलं, की पहाट येणार. अर्ली मॉर्निंग... नाही का?'

'रोज नाही येत तुमच्याकडं?'

'रोजची वेगळी. दिवाळीची वेगळी. तिला भाई-अण्णा-बाबूजी वगैरे हजेरी लावतात.'

'तेपण शास्त्र असतं?'

'नाही रे वेडबंबू. ती कला असते. आपल्याला येणारी तीच तीच गाणी वेगवेगळ्या पॅकेजिंगमधून श्रोत्यांच्या माथी मारण्याची कला. एवढी दिवाळी आहे म्हटल्यावर तोंडी लावायला साहित्य-संस्कृती नको?'

'आजोबाऽऽ ग्रँडऽऽपाऽऽ जरा मला कळेल असं बोला ना...'

'आधी मला कळू दे; मग तुला सांगतो सोन्या. एरवी, कुठं नेलीत दिवाळी माझी? असं विचारण्यापर्यंत आलोय मी.'

'ते कोण ते, भाई, अण्णा वगैरे घरी आले की विचारा.'

'नाही रे. तोच तर वांधा आहे. आता सहज म्हणून सणावारी एखाद्याच्या घरी जाणं, घरगुती पदार्थांनी स्वागत करणं, छोट्याशा रांगोळीचं-कंदिलाचं कौतुक करणं हे सगळं एकेक जात चाललंय रे. दिवाळ्या करायच्या त्या शॉपिंग मॉलमध्ये, नाही तर रिसॉर्टवर. हेच शास्त्र होत चाललंय.''तुझी आजुली ठरवेल ते. तिला पाडव्याला मी काय ओवाळणी घालायची, हे तीच ठरवते ना! क्रेडिट कार्डावर काहीही विकत घेऊन येते, ओवाळणीच्या तबकात घालायला सांगते. मी फक्त विचारतो, यंदा उकळणी काय ठरवलीयस? ओवाळणीला उकळणी म्हणतो ना! अर्र्रर्र... माय गॉड...''अरे शुंभा, दिवाळीच्या पणत्या माळ्यावरून काढून, पुसून, मांडून ठेवायला सांगितल्या होत्या तिनं मला. तेवढंही काम जमलं नाही, तर पाडव्याला चक्क्याऐवजी मलाच उलटा टांगून... बाय बाय रे. उद्या बोलू. तेरी-मेरी कसलीही असो, हॅपी दिवाली रे...'आजोबांनी बोलता बोलता फोन बंद करून सरळ गॅलरीकडे धाव घेतली. घराला अंगण नव्हते. विसाव्या मजल्यावरच्या फ्लॅटला बाकी खूप मिनिटिज असल्या, तरी 'अंगण वॉझ नॉट प्रोव्हायडेड.' त्यांनी गॅलरीत येऊन उगाचच चौफेर नजर फिरवली. बाहेर बराचसा अंधार झाला होता. हवेत खास दिवाळीचा अश्विनी गारवा अलगदपणे उतरला होता. दूर दिसणाऱ्या रस्त्यावर खचाखच भरलेली वाहने, दिव्यांचे तीव्र-तीक्ष्ण प्रकाशझोत टाकत सरकत होती. त्याच वेळी खाली जमिनीवर, सोसायटीच्या वॉचनमनच्या टपरीबाहेर एक पणती मंदपणे तेवत होती. तिच्या प्रकाशाची सौम्यशी रेषा वाऱ्यावर झुलत होती. तिच्यासाठी शास्त्र नव्हते, कला नव्हती, काहीच सिद्ध करण्याची जोखीम नव्हती. ती आपल्याच नादात झुलत होती. वाटेत येणाऱ्या सर्वांना तोंडभरून 'शुभ दीपावली' म्हणत होती.

# सणाचा स्वप्नवत सांगावा...

पुण्यातील रस्त्यांवर होणारी कोंडी एकदम नाहीशी झाली आहे. सायकलपासून ते बसपर्यंत आणि ट्रक-टेम्पोपासून ते कारचालकांपर्यंत सर्व जण वाहतुकीचे नियम पाळत आहेत. सतत पुढे जाण्याची वाहनचालकांची घाई कमी झाली आहे. चौकांमध्ये वाहतूक नियंत्रक दिवे (सिग्नल) तोडून पुढे जाण्याची घाई असलेले वाहनचालक चक्क 'झेब्रा क्रॉसिंग'च्या मागेच थांबत आहेत. प्रवेश बंद, नो पार्किंग अशा नियमांचे उल्लंघन कमी झाले आहे. त्यामुळे वाहतूक पोलिसांचे कामही कमी झाले आहे. पुण्याच्या वाहतुकीत काहीच सुधारणा होणार नाही, असे वर्षोनुवर्षे सांगणाऱ्यांना आश्चर्याचा धक्का बसला आहे.वाहतूक कोंडीचा अंधार दूर करण्यासाठी दिवाळीत 'नागरिकांच्या स्वयंशिस्तीचा' एक तेजाचा दिवा लावणे गरजेचे आहे.इंदूरला मागे टाकून पुण्याने 'स्वच्छ सर्वेक्षणा'त बाजी मारली आहे. शहरातील रस्त्यांवर अस्वच्छतेचा मागमूस राहिलेला नाही. कचऱ्याचे ढीग नाहीसे झाले आहेत. ओला-सुका कचरा असे कचऱ्याचे वर्गीकरण घरोघरी होत आहे. अनेक दुकानदारांनी त्यांच्या दुकानांच्या बाहेर कचरा टाकण्यासाठी पेट्या ठेवल्या आहेत. शहरातील सर्व स्वच्छतागृहांमध्ये स्वच्छता आहे. तेथील दुर्गंध नाहीसा झाला असून, स्वच्छतेचा मंत्र लहानांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांच्या मुखी पोहोचला आहे. पुढील काही वर्षे स्वच्छतेचा हाच निर्धार कायम ठेवण्याची शपथ पुणेकरांनी घेतली आहे.अस्वच्छतेची काजळी दूर करण्यासाठी दिवाळीत 'स्वच्छ पुणे, सुंदर पुणे'ची ज्योत सर्व नागरिकांच्या मनामनात तेवत राहील, याची काळजी घ्यायची आहे.पुण्यातील घराघरांतील नागरिकांना आता पुरेसे आणि २४ तास पाणी मिळते आहे. नळ सोडला, की सहज पाणी येत असल्याने पाणी साठवून ठेवण्याची सवय पुणेकरांनी मोडली आहे. पाणी वाचविण्यासाठी पुणेकरांनी अनेक ठिकाणी पर्जन्य जलसंचय ही योजना प्रभावीपणे राबविली आहे. बऱ्याच इमारतींमध्ये फ्लशसाठी याच पाण्याचा पुनर्वापर केला जात आहे. पुण्यात कोणत्याही घरात आता टँकरचे पाणी येत नाही. पाण्याची सक्षम वितरण व्यवस्था तयार झाल्याने कुठे कमी दाबाने आणि कुठे जादा वेळ पाणी हे असमान वितरण बंद झाले आहे. त्यामुळे पुण्याच्या पाण्यात बचत होत असून शेतीला आवश्यक पाणी उपलब्ध होत आहे.पाण्याचा एक एक थेंब वाचवून 'जल हेच जीवन'चा संदेश अधिक प्रकाशमान करण्यासाठीचा दिवा कायम तेजोमय राहण्यासाठी प्रयत्न करायचे आहेत.पुण्यातून वाहणाऱ्या मुळा-मुठा या दोन्ही नद्यांमधील प्रदूषण आता इतिहासजमा झाले आहे. या दोन्ही नद्यांमध्ये प्रक्रिया करूनच सर्व पाणी सोडले जात आहे. नदीच्या तीरावर अनेक नागरिक आता चालण्यासाठी,



फिरण्यासाठी, वेळ घालवण्यासाठी येत आहेत. देशातील सर्वांत प्रदूषित नद्यांमध्ये या नदीचा समावेश होता, हे सांगितल्यास अनेकांचा सध्या त्यावर विश्वास बसत नाही. नदीचा प्रवाह खेळता झाला असून, नदीत अतिक्रमण होऊ नये, कचरा-राडारोडा टाकला जाऊ नये, यासाठी सरकारी यंत्रणांची भरारी पथके बारकाईने लक्ष ठेवून आहेत. नदीपात्र आता अधिक मोकळे आणि स्वच्छ झाले आहे.नदीकिनाऱ्यामुळेच पुण्याला ओळख मिळालेल्या मुळा-मुठेच्या पाण्याचा खळाळता प्रवाह दिव्यांच्या माळांप्रमाणे लखख उजळत ठेवण्याचा पुणेकरांचा संकल्प आहे.शिक्षण-नोकरीसाठी बाहेरून पुण्यात येणाऱ्या आणि इथे कायमस्वरूपी वास्तव्य करणाऱ्यांना आता पुणे आपले शहर वाटू लागले आहे. केवळ पैसे कमावणे एवढेच त्यांचे ध्येय नाही, तर आपल्याला जगण्याचे साधन देणाऱ्या या शहराप्रति कृतज्ञ भावना त्यांच्या मनात निर्माण होत आहे. पुणे आणि पुणेकरांवर कायम टीका-टिप्पणी करणाऱ्यांच्या तोंडी आता स्तुती आणि कौतुकाच्या शब्दांनी घर केले आहे. येथील व्यवस्था अधिकच चांगली आणि सक्षम होण्यासाठी या पुण्याबाहेरच्या आणि आता नव्याने पुणेकर झालेल्या सर्वांनी पुढाकार घेतला आहे. पुण्याच्या संस्कृतीमध्ये ते सहभागी होत आहेत आणि पुण्याला आपलेसे करत आहेत.रंग वेगवेगळे असले, तरी एकत्र आल्यानंतर त्यातून दिसणाऱ्या एकसमान रंगावलीनुसार एकत्र गुण्यागोविंदाने नांदण्याचे व्रत सर्व पुणेकरांनी घेतले आहे.महापालिकेपासून ते वाहतूक पोलिसांपर्यंत आणि पुण्यातील विविध सरकारी कार्यालयांपासून ते राजकीय नेतेमंडळी-पुढाऱ्यांपर्यंत सर्वांसाठीच आता नागरिक केंद्रबिंदू झाला आहे. एखादी समस्या घेऊन जाणाऱ्या नागरिकाला केवळ आश्वासन मिळत नाही, तर कधीपर्यंत ती समस्या दूर होईल, याचा आडाखा मिळतो. सरकारी विभागात नागरिकांना आता रांगेत उभे राहावे लागत नाही, तर त्यांच्यासाठी विविध सोयीसुविधा देऊन त्यांचे काम लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. महिला, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक यांना तर घरपोच सेवा दिली जात आहे. 'सरकारी काम आणि सहा महिने थांब' ही म्हणच आता विस्मृतीत गेली आहे.एवढ्यात सरकारपासून ते सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करून मध्यरात्री १२ वाजता एक जोरदार फटाका फुटला. त्याची तक्रार करणाऱ्या नागरिकांना 'दिवाळी आहे, कधी तरी आवाज होणारच,' असे सरकारी छापाचे उत्तर मिळाले. त्यानंतर, आणखी काही वेळ फटाके फुटतच राहिले आणि तिमिरातून तेजाकडे नेणाऱ्या या प्रकाशाच्या उत्सवातही नेहमीची गडद छाया उमटतच राहिली.स्वप्न खरे, की सत्य! सत्यापेक्षा स्वप्नातच राहिलेले बरे, अशा दोन्ही बाजू असताना, दिवाळीपासून सुरू होणाऱ्या नव्या 'संवत्सरा'त यातील काही स्वप्ने प्रत्यक्षात येण्यासाठी सर्व मने प्रकाशाने उजळू या.

# ध्येयवादी व द्रष्टा नेता-पंडितजी

पंडीत नेहरुंचे व्यक्तिमत्व समजावयाचे असेल तर पंडितजींच्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोण समजून घ्यावा लागेल. ज्या भू-खंडात व कालखंडात ते काम करीत होते, तिथे इतिहासाने कोणते काम वाढून ठेवले होते याची संपूर्ण कल्पना असणारे जे थोडे नेते दुनियेत होते त्यामध्ये पंडीत नेहरु हे प्रमुख होते. भारताचा स्वातंत्र्य लढा हा अखिल मानवतेच्या स्वातंत्र्याच्या लढयाचा अतूट असा भाग आहे, याची जाणीव ठेवून काम केल्यामुळे स्वातंत्र्यानंतर जे प्रश्न भारतापुढे वाढून ठेवले होते त्याचा त्यांनी स्वातंत्र्यापूर्वीच्य काळात विचार केला होता. एवढेच नव्हे तर त्याला संघटित आकार देण्याचा व त्याला अनुकूल असे जन-मत बनविण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता.भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून नेहरुंच्या समोर उभ्या असणाऱ्या समस्या विविध होत्या आणि एकेका समस्येचे स्वरुप अतिशय गुंतागुंतीचे व अजस्त्र होते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. भारताच्या समस्या एकाएकी निर्माण झाल्या नव्हत्या. शतकानुशतके त्या समस्या साठत आलेल्या होत्या. त्यांना सर्व प्रश्नांची तात्काळ आणि समाधानकारक सोडवणूक हवी होती. नेहरुंचे मोठेपण असे तर ते यात आहे की, स्वातंत्र्यपूर्व काळापासुन भारतासमोरील प्रश्नांचा त्यांनी विचार सुरु केलेला होता आणि स्वत:च्या मनाशी त्यांनी प्रश्नांच्या उलगडयासाठी काही दिशा निश्चित केलेल्या होत्या. त्यामुळे इतके अवघड कार्य त्यांनी काही अवधितच केले.पंडीतजींच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू होते, पंडीतजी ध्येयवादी व दृष्टे होते. परंतू त्याच बरोबर ते कट्टर राष्ट्रवादी पण होते. बुध्दिवादी असुन सुध्दा त्यांना जन-कल्याणाची तळमळ आणि सर्व सामान्य व दलित लोकांबद्दल आत्यंतिक सहानुभूती होती त्यांचा आदर्शवाद दांडगा होता. परंतू त्याचबरोबर वास्तववादाची कास त्यांनी कधीच सोडली नाही. १९२० ते १९४५ हा कालखंड घेतला तर भारतीय जनतेच्या मनावर गांधी आणि नेहरु यांचा ठसा सर्वात मोठा आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीत ते दोघेही एकमेकांशी निकट सहकार्य करीत सहभागी झालेले होते. नेहरु हा माणुस आणि नेहरु हा राजकिय नेता या उभय नात्यांनी या सबंधाची तपासणी अधिक महत्वाची आहे. मोतीलालांच्या पेक्षाही नेहरुंच्या वर गांधीजींचा जास्त प्रभाव होता किंबहूना व्यक्तीचा प्रभाव म्हटला तर नेहरुंच्या जीवनाला प्रभावित करणारी सर्वात मोठी व्यक्ती गांधी ही होती.१३ डिसेंबर १९४६ रोजी घटना परिषदेच्या सभेत पंडीत नेहरु म्हणाले की, मी जेव्हा भविष्यकाळाचा विचार करतो, तेव्हा उज्वल भूतकाळ आणि महान भविष्यकाळ यांच्या मधील वर्तमानकाळाशी तलवारीच्या टोकावर मी उभा आहे, असे मला वाटते. एकाप्रकारे मला थरकाप आल्या सारखा वाटतो. भारताच्या इतिहासातील एक चमत्कारिक क्षणी आपण इथे जमलो आहोत. या संक्रमणाच्या क्षणांत एक प्रकारची जादु आहे असे मला वाटत आहे. तसे कां वाटते ते मला सांगता येणार नाही. मला जुन्या नव्याच्या संक्रमण काळात एक प्रकारची जादु आहे यात शंका नाही. अंधाऱ्या रात्रीचे रुपांतर दिवसाच्या प्रकाशात व्हावे व आकाश मेघांनी भरुन गेले असलेले तरी कालांतराने ढग विरुन जाऊन सुर्यप्रकाश यावा, त्यावेळी जसे आपणाला वाटते तसे मला आज वाटत आहे. अशा अनेक कारणांमुळे आपणांपुढे बोलतांना मला अडखळल्या सारखे होत आहे. आपल्या पुढील प्रचंड कार्याच्या भारामुळे मी आधीच दडपुन गेलो आहे.खरे तर हा दिवस म्हणजे बालकांवर अलोट प्रेम करणाऱ्या पंडीत जवाहरलाल नेहरुंचे जीवन समजून घेण्याचा दिवस आहे. नेहरुचाचा मोठे राजकारणी, थोर विचारवंत होते. परंतू असे असूनही त्यांनी आपली रसिकता, निरागस मन, खेळाडूवृत्ती ही वैशिष्ट्ये जपली होती. निसर्ग आणि मुले यांवर त्यांचे विशेष प्रेम होते. आपल्या कामातून वेळ मिळेल तेव्हा ते नेहमी मुलांच्या आणि निसर्गाच्या सहवासात रमत असंत.



प्रविण बागडे
नागपूर
मो : ९९२३६२०९१९

दिसता सुंदर लाल टपोरे फूल गुलाबाचे
आठवते हे रुप देखणे पंडितजी तुमचे

जवाहरलाल मोतीलाल नेहरु यांचा १४ नोव्हेंबर १८८९ मध्ये श्रीमंत कुटुंबात जन्म झाला. त्यांचे वडील नामांकित वकील आणि थोर राजकीय नेते होते. त्यांची आई स्वरुपांनी धार्मिक वृत्तीची



होती, त्यांनी जवाहरलाल यांच्यावर उत्तम संस्कार केले. भारतात काही शिक्षण पूर्ण केल्यावर जवाहरलाल १९०५ मध्ये इंग्लंडमध्ये शिक्षणसाठी गेले. तेथे हॅरो, कॅम्ब्रिज व ट्रिनिटी या शिक्षण संस्थात त्यांनी उच्च शिक्षण घेतले. त्याठिकाणी सात वर्षे काढतांना अभ्यासक्रमाबरोबर त्यांनी अवांतर खूप वाचन केले. त्या वाचनात त्यांनी देशोदेशीच्या देशभक्तांची चरित्रे वाचली, त्यांचा नेहरुंच्या मनावर परिणाम झाला. आपणही आपल्या देशासाठी काही करावे असे त्यांना वाटू लागले. पुढे सृष्टीशास्त्र, वनस्पतीशास्त्र व भूस्तरशास्त्र घेऊन ते स्नातक झाले व बॅरीस्टर होऊन भारतात परत आले.जवाहरलाल नेहरु यांचा कमलादेवींशी विवाह झाला. त्याच वर्षी नेहरुंची गांधीजींशी लखनऊच्या काँग्रेस अधिवेशनात भेट झाली. त्या भेटीत गांधीजींनी सांगितले त्या विचारांचा जवाहरलाल यांच्यावर प्रभाव पडला. गांधीजींच्या मार्गानेच जायचे नेहरुंनी ठरविले. सत्याग्रह, अहिंसा, स्वदेशी, असहकार हे मार्ग वापरुन इंग्रजी सत्तेविरुध्द स्वातंत्र्य लढयात जवाहरलालजी सहभागी झाले. असहकारीतेच्या चळवळीत त्यांना पहिला तुरुंगवास भोगावा लागला. गांधीजींच्या ते अधिक निकट जात राहिले आणि लखनौच्या पुढील कॉग्रेस अधिवेशनात त्यांची अध्यक्षपदी निवड झाली. जवाहरलालजी जनतेच्या बरोबरीने आंदोलनात सहभागी झाले. त्यांच्या सक्रीय सहभागामुळे त्यांना जवळजवळ पंधरा वर्षे तुरुंगात काढावी लागली. तुरुंगात किंवा तुरुगांबाहेर कुठेही असले तरी जवाहरलाल यांनी आपल्या मनाला आनंदी ठेवण्याचाच प्रयत्न केला.नेहरु लोकप्रिय होते त्यामुळेच १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यावर त्यांना भारताचा पहिला पंतप्रधान होण्याचा सन्मान प्राप्त झाला. १५ ऑगष्ट १९४७ ते २७ मे १९६४ दरम्यान ते भारताचे पहिले पंतप्रधान राहिले. पंडितजींनी भारताच्या सर्व भागात संचार केला होता. निसर्गाने भारताने दिलेल्या अमोल विचारधनाचा त्यांनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथात गौरव केला आहे. जवाहरलाल नेहरुंनी तुरुंगातून आपली कन्या प्रियदर्शीनीला पत्रे लिहीली आहेत, त्यातून त्यांचा सहृदय कवी मनाचा परिचय घडतो. लहान मुलांवर त्यांचे खूप प्रेम होते. त्यांचे प्रत्यक्ष दर्शन आम्हा मुलांना घडले नसले तरी त्यांचे फोटो पाहूनही त्यांच्या रसिकपणाची ओळख पटते, ज्यांनी त्यांना प्रत्यक्ष पाहिले आहे ते सांगतात की, नेहरु कुठे मोटारीतून चालले असले किंवा सभेसाठी आले असले तरी मुलांचा घोळका दिसताच मुद्दाम तिथे जाऊन मुलांना भेटत असत. कुणाला कुरवाळतील, कुणाचा मुका घेतील, कुणाच्या हातात हात फिरवतील एवढे त्यांना मुलांच्या सहवासाचे वेड होते. याचा जगातल्या मुलांना अनुभव आल्यामुळेच ती सारी मुले त्यांना 'नेहरुचाचा' म्हणत आणि ते 'फुलामुलांचे नेहरु' म्हणुन ओळखले जात होते. या बालकप्रिय जवाहरलालजींच्या जन्मदिनी १४ नोंव्हेंबरला दरवर्षी 'बालकदिन' साजरा करण्याची प्रथा देशात सुरु झाली. जेव्हा-जेव्हा भारतीय सविधांनाचा प्रश्न निघाला त्याठिकाणी पंडीतजी सरळ डॉ. आंबेडकरांकडे बोट दाखवायचे. कारण त्यांना माहित होतं की, आंबेडकरांसारखा प्रकांडपंडित आपल्या देशात दुसरा नाहीच.सांस्कृतिक ऐतिहासिक दृष्टया समृध्द असलेल्या भारताला नव्या काळात वैज्ञानिक दृष्टिनेही प्रगत करणे आवश्यक आहे, हे जाणून त्यांनी भारताची जडण-घडण करण्यासाठी अथक प्रयत्न केले. त्यांनी जनतेला 'आराम हराम है' या घोषणेनी प्रेरणा दिली. सलग १८ वर्षे त्यांनी भारताचे पंतप्रधान पद सांभाळले. देश-विदेशात संचार करुनही ते नेहमी लोकांत मिसळून जात. १९५२ मध्ये त्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च पुरस्कार देण्यात आला. भारताप्रमाणेच ते परदेशातही लोकप्रिय झाले होते. विध्वंसाची आणि विनाशाची वाटचाल करण्यात अर्थ नाही म्हणून त्यांनी तिबेटचा प्रश्नावर चीनशी पंचशील करार केला या कराराला जागतिक महत्व होते. पंचशील तत्त्वाचा पुरस्कार केला आणि शेजारी राष्ट्रांना सहजीवन आणि सहकार्य यांचे महत्व पटवले. परंतू १९६२ मध्ये चीनने त्या तत्वांना हरताळ फासून भारतवर आक्रमण केल्यानंतर पंचशील कराराचा पायाच उध्वस्त झाला. तेव्हा पंडीतजींना याचे फार दु:ख झाले व त्यामुळे त्यांना मानसिक आघात सहन करावा लागला.नेहरुंना निसर्गाचे वेड होते, बर्फाच्छादित गिरी-शिखरांचे, झऱ्यांचे, धबधब्यांचे त्यांना आकर्षण होते. त्यांना फुलांचे प्रेम असे त्यांचा शेरवाणीत लटकलेला टवटवीत लाल गुलाब त्यांच्या सौंदर्य दृष्टीचे प्रतिक होते. त्यांना साध्या-सुध्या खेळुतांशी आणि मुलांशी बोलतांना फार आनंद व्हायचा. कारण अव्याज निष्पापपणा त्यांना तिथे आढळे. भान विसरुन आपल्या आवडत्या गोष्टीकडे वळण्याची अनावर इच्छा त्यांचा मनात उसळुन येई, पण तिला ते आवर घालीत. भारतीय जनतेशी ते वचनबध्द होते, आपल्या आश्वासनाची पुर्ती झाल्याशिवाय आपल्याला मोकळीक नाही, याची जाणीव त्यांना होती.पंडित नेहरु मानवतावादी, आंतरराष्ट्रीय दृष्टीचे मुत्सदी होते. परंतू ते कट्टर राष्ट्रभक्त पण होते, इतिहासतज्ञ, विज्ञाननिष्ठ, उत्तम प्रशासक, समाजवादी विचारसरणीचा एक मुक्त विचारवंत असलेला हा महापुरुष सामान्यत:ही तितक्याच तन्मयतेने रममान होत असे, अशा महान व्यक्तीचा हया विभिन्न पैलुंचा आविष्कार आज सुध्दा आपल्याला चकीत करुन सोडतो. संपुर्ण जीवन राजकीय क्षेत्रात घालवतांना माणसे थोडीशी स्थुल होतात, सुक्ष्म विचारांचा छटा ही गमवतात. सुसंस्कृतपणा आणि शिष्टाचार पुष्कळशे कोमेजु लागतात. कारण राजकारणाचे स्वरुप असेच धकाधकीचे असते. राजकारणांच्या धकाधकीत आणि उग्र संघर्षच्या वातावरणात असतांना सुध्दा त्यांचे सुसंस्कृत आणि शिष्टाचार यांचा वागणुकीतील सौष्ठव आणि सौजन्य कधी उणावले नाही. कवितेचे व संगीताचे ते दर्दी होते, पुष्कळदा संगीताच्या कार्यक्रमात ते दीर्घ वेळ थांबत. केवळ सतार ऐकण्यासाठी त्यांनी कार्यक्रम शेवट पर्यंत थांबून ऐकला आहे.रविन्द्रनाथ टागोरांनी नेहरुंच्या विषयी असे म्हटले आहे की, त्यांनी केलेले कार्य मोठे असले, तरी नेहरु हा माणुस आणि त्यांची व्यक्तीत्व त्याहीपेक्षा मोठे आणि ज्या परिसरात, ज्या वातावरणात त्यांचे कार्य विकसित झाले, त्यातील सर्वापेक्षा ते कितीतरी पांजळ आहेत. भारतीय जनतेचे प्रेम त्यांचावर होतेच इतके प्रेम त्यांनी कुणावर क्वचितच केले असेल या प्रेमाचे कारण नेहरुंनी केलेला त्याग, त्यांनी भोगलेले कष्ट ईतर लोकांचा प्रेमाचे कारण होतेच व त्यापेक्षा नेहरुंचे आकर्षण निराळे होते. त्यांचे राजकीय शहाणपण, त्यांचे बहुरंगी समृध्द व्यक्तीमत्व या सर्वांच्यापेक्षा ज्या सुसंस्कृतपणे ते देशाचा कारभार पाहात असत त्यामुळे जनेतेचे त्यांचेवर अगाध प्रेम होते. एका राष्ट्राच्या भाग्यविधात्यावर राष्ट्राची गाढ श्रध्दा असावी तशी नेहरुंच्यावर लोकांची श्रध्दा होती. ती श्रध्दा धुसर होता कामा नये, त्याची त्यांनी दक्षता बाळगलेली होती म्हणुन देशाच्या कारभारात त्यांच्या हातुन कोणतेही गैरवर्तन घडले नाही किंवा घडण्याचा संभव ही नव्हता. इतके ते प्रामाणिक व प्रांजळ होते हे सर्व सर्वश्रृत आहे. भारत पुर्नजन्म घेत आहे व तो निर्भय सामर्थ्यवान व नवजीवन संपन्न होत आहे, आपण यावेळी साफ दृष्टिने भारताकडे बघायला पाहिजे. अशा थोर नेत्याला माझे शतश: प्रणाम !

# खुंटेफळ साठवण तलाव कामासंबंधी फकीर कोण ? आणि मुर्गा कोण ? हे लवकरच दाखवून देऊ

## आ.सुरेश धस यांचा आ.बाळासाहेब आजबे यांचेवर पलटवार

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये बदल घडवू शकेल असा असणारा खुंटेफळ साठवण तलावाच्या कामाबाबत मी केलेल्या पाठपुराव्यासंबंधीची (नस्ति) फाईल लवकरच आपणासमोर ठेवून खुंटेफळ साठवण तलाव या योजनेतील..मुर्गा कोण ? आणि फकीर कोण ? आणि अंडा कोण खात आहे ? हे पत्रकारांसमोर लवकरच मांडणार आहे...असा पलटवार आ.सुरेश धस यांनी पत्रकार परिषदेमध्ये केला..आष्टी येथील निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते..आ.बाळासाहेब आजबे यांनी नुकत्याच झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये खुंटेफळ साठवण तलाव जलवाहिनी कामाच्या टेंडर बाबत आ.सुरेश धस यांचे वर मेहनत करे मुर्गा और अंडा खाये फकीर अशी मल्लिनाथी केली होती.. त्यावर पलटवार करताना.. ते पुढे म्हणाले की,सध्या दिवाळी हा सण असल्यामुळे आपण सर्वांनाच शुभेच्छा देत आहोत दिवाळी सण साजरा केल्यानंतर आपण खुंटेफळ साठवण तलाव या योजनेबाबतच्या फाईल (नस्ति) ची सत्यप्रत मागवण्यासाठी अर्ज केलेला आहे त्या नुसार.. संबंधित दस्तऐवज प्राप्त होताच आपण पुन्हा एक पत्रकार परिषद आयोजित करून या खुंटेफळ साठवण तलावासाठी केलेल्या पाठपुराव्या संबंधी केलेला पत्रव्यवहार पत्रकारांसमोर सादर करून वस्तुस्थिती समोर आणणार आहोत या तलावाच्या सर्वेक्षणापासून ते मंजुरी पर्यंत आपण स्वतः शासन दरबारी प्रयत्न केलेले असून आ.बाळासाहेब आजबे यांनी या कामासाठी काय काय केले आहे ? ते सांगावे माझ्या पत्रानंतरच या कामासंबंधीची फाईल पुढे सरकली असून नंतरच कार्यवाही झालेली आहे यासंबंधीचे दस्तऐवज प्राप्त करत असून आ.बाळासाहेब आजबे यांनी त्यांचे कडील पाठपुरावा केल्यासंबंधीचे दस्तऐवज दाखवावेत त्यानंतरच त्यांनी याबाबत बोलणे योग्य होईल असे सांगून...शिंपोरा ते थेट खुंटेफळ साठवण तलावासाठीच्या जलवाहिनीच्या कामाचे टेंडर आ.बाळासाहेब आजबे यांनी..ईपीसी पद्धतीने टेंडर निघावे अशी मागणी केली होती..ती रद्द होऊन माझ्या



मागणीप्रमाणे या जलवाहिनी कामाचे बी-१ पद्धतीने टेंडर काढण्यात येणार आहे. अशी माहितीही त्यांनी दिली..त्यानंतर..आष्टी विधानसभा मतदारसंघांमधील आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत मध्ये आपल्या भारतीय जनता पक्षाचे किती ग्रामपंचायती मध्ये सरपंच निवडून आले आहेत ? असे विचारले असता ते म्हणाले की,लोकनेत्या पंकजाताई साहेब मुंडे,खा.प्रीतमताई मुंडे यांचे नेतृत्वाखाली ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये घवघवीत यश प्राप्त केले असून..आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यामध्ये मतदारांनी चांगला प्रतिसाद दिलेला आहे असे सांगत आष्टी तालुक्यातील सांगवी आष्टी येथे सरपंच संदीप खेडकर आणि चार सदस्य,धिरडी ग्रामपंचायत बिनविरोध झाली असली तरी सरपंच श्रीमती आशाबाई करडुळे आणि सदस्य पाटोदा तालुक्यातील मुगगाव येथे सरपंच सौ स्मिता रविंद्र केकाण,गांधनवाडी ग्रामपंचायत चे सरपंच पदी श्री अशोक यशवंत जेधे,धनगर जवळका येथे सरपंच सौ सुरेखा अभय पवार, रोहतवाडी ग्रामपंचायत च्या सरपंचपदी सौ छाया पांडुरंग शिंदे,वडझरी येथे सरपंचपदी सौ अंजली संजय सानप,तांबा राजुरी येथे सरपंचपदी श्री.गणेश तांबे आणि चुंबळी येथे सरपंच पदाचा उमेदवार पराभूत झाला तरी तीन ग्रामपंचायत सदस्य भारतीय जनता पार्टीच्या विचाराचे निवडून आलेले आहेत शिरूर कासार तालुक्यातील..पिंपळनेर चे सरपंचपदी श्री.मिठू जायभाये,उकिरडा चकला चे सरपंचपदी श्री राजेंद्र पानसंबळ, तिंतरवणीचे सरपंचपदी श्री उद्धव खेडकर तरडगव्हाण येथील सरपंच पदी सौ मंगल अंकुश चवरे घोगस पारगाव येथे तीन ग्रामपंचायत सदस्य, बोरगाव चकला येथे सरपंच श्री नवनाथ महादेव खेडकर हे नवनिर्वाचित सरपंच आणि सदस्य यांचा आपण निवासस्थानी सत्कार केला असून उर्वरित सरपंच यांचा भेट भेटीसाठी आल्यानंतर सत्कार करण्यात येणार आहे असे त्यांनी सांगितले.

## देवळाली येथे सरपंच चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद प्रथम पारितोषिक २१००० रुपये



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील देवळाली येथे यावर्षी प्रथमच भैरवनाथ क्रिकेट क्लब च्या वतीने सरपंच चषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे दिवाळीच्या सुट्यांमध्ये या स्पर्धेचे आयोजन केल्याने मोठ्या प्रमाणात संघाने सहभाग नोंदवला आहे देवळाली,कडा,घाटा पिंपरी, लोखंडवाडी,खरकटवाडी, आल्हणवाडी,चितळवाडी, धामणगाव,दादेगाव,गहूखेल, खिळद,वाघदरा, नेवासा,डोंगरगण या गावांच्या संघानी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला आहे या स्पर्धेमध्ये देवळाली गावचे सरपंच पोपट शेकडे यांच्या वतीने २१ हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक, तर हरीभाऊ तांदळे(माजी सरपंच) यांचे द्वितीय पारितोषिक १५,५५५ आहे माजी सरपंच शैलेश मोहिते यांच्या वतीने ७७७७ तिसरे बक्षीस ठेवण्यात आले आहे या स्पर्धेसाठी भैरवनाथ क्रिकेट क्लब च्या वतीने बहारदार नियोजन हे करण्यात आले आहे स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी रविंद्र नागरे, नितीन घुले,बंडु टकले,बाळु तांदळे,राजु तांदळे,दत्तु टकले यांच्याशी संपर्क करावा या स्पर्धेसाठी कृष्णा शेकडे व ज्ञानेश्वर तांदळे यांचे विशेष सहकार्य लाभलं आहे या स्पर्धेला शुक्रवार दिनांक १० रोजी सरपंच पोपट आबा शेकडे, सरपंच मनोज गाढवे,सरपंच मोहन आमटे,सरपंच प्रल्हाद मुळीक, उद्योजक भागचंद झांजे,उपसरपंच राजेंद्र पवार, उपसरपंच अमोल तळेकर, संदिप शिंदे,राजु तळेकर,माजी सरपंच हरीभाऊ तांदळे,माजी सरपंच शैलेश मोहिते,दिलीप तांदळे, अमोल तळेकर,कृष्णा तांदळे,पत्रकार शरद तळेकर पत्रकार अतुल जवणे ग्रा.पं. सदस्य काकासाहेब कटके,गणेश खाडे,विजय आमले,बाळू तांदळे,विजय नागरे,दिपक पवार यांच्या उपस्थितीत उदघाटन सोहळा पार पडला यावेळी भैरवनाथ क्रिकेट क्लबच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

## लोणार शहर व तालुक्यातील अवैध धंदे बंद करा अन्यथा आमरण उपोषणाचा सुधाकरराव नरवाडे यांचा इशारा

**लोणार । प्रतिनिधी**

लोणार व तालुक्यातील अवैध धंदे बंद करून कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी सुधाकरराव नरवाडे यांची मागणी अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे निवेदनात नमूद केले आहे की सर्व प्रथम साहेब यांचे अभिनंदन आभार मानले आहे कारण आपण आल्यापासून शहरात ऑनलाईन चक्री बंद करण्यात आला होता परंतु शहरात व तालुक्यातील अवैध वरली मटका जुगार, देशी व विदेशी दारू विक्री व वाहतूक राजरोसपणे सुरू आहे अवैध गुटखा सर्रासपणे सुरू आहे आणि अवैध वाहतूक सर्रास सुरू आहे या संबधी ठाणेदार साहेब यांना भ्रमणध्वनी द्वारे संपर्क केला असता आपण कारवाई चालू आहे आपणांस चुकीची दिली आहे असे ठाणेदार साहेब बोलले होते . तरीही शहरात व तालुक्यात अवैध धंदे खुलेआम सुरू आहे जसे अवैध वरली मटका जुगार देशी व विदेशी दारू विक्री व वाहतूक अवैध गुटखा विक्री अवैध वाहतूक राजरोसपणे सुरू



आहे तरी आपण या निवेदनाची दखल घेऊन अवैध धंदे बंद करून कारवाई करण्यात यावी अन्यथा आपल्या कार्यालया समोर दि.१८/११/२०२३ रोजी आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा सुधाकरराव नरवाडे यांनी दिला आहे या मागण्या मान्य न झाल्यास याचे जबाबदार संबंधित विभागाची राहिल असे निवेदनात नमूद केले आहे.

## ऐन दिवाळीत मंगळवेढा आगाराला एकाच दिवशी अकरा लाखाचे उत्पन्न



**मंगळवेढा । प्रतिनिधी**

मंगळवेढा आगाराने दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर एकाच दिवसात अधिकारी, महामंडळाचे चालक व वाहक यांच्या प्रयत्नाने ११ लाख ७१ हजार ७३४ रुपयाचे उत्पन्न मिळाल्याची माहिती आगार व्यवस्थापक संजय भोसले यांनी दिले.दिवाळी सण आणि हुलजंती यात्रेच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात येण्या जाणाऱ्यांची संख्या वाढली आहे वाढलेल्या नागरिकांनी ये जा करण्यासाठी एसटी बसेसचा आधार घेतला आहे त्यामुळे एसटीला उत्पन्न वाढीची संधी मिळाली मंगळवेढा आगारामध्ये सध्या ६० बसेस कार्यरत असून वाहक चालक सहित २९० कर्मचारी कार्यरत आहेत.या आगाराचे उत्पन्न मध्यंतरीच्या काळात कमी झाले होते. शासनाने एसटीचे उत्पन्न वाढावे या दृष्टिकोनातून महिला सन्मान योजना व जेष्ठ नागरिकांना मोफत बससेवा सुरू केली. यामध्ये महिलांना ५०% तिकटामध्ये कुठेही प्रवास करण्याची सोय महामंडळाच्या बसेस मधून केल्यामुळे एसटीच्या उत्पन्नामध्ये वाढ झाली.१० नोव्हेंबर या दिवशी २१,६४७ किलोमीटरची वाहतूक करून सवलतीसह प्रति किलोमीटर ५४.१३ रुपयाचे उत्पन्न मिळवले. मंगळवेढा आगारातून सध्या पंढरपूर, सोलापूर ,सांगोला,पुणे, यासह ग्रामीण भागात प्रवाशांना सुविधा दिल्या जातात सध्या अनेक ठिकाणी लांब पल्याच्या गाड्यांची आवश्यकता आहे. सध्या महामंडळाने पंढरपूर- चडचण, मंगळवेढा- गाणगापूर ही बस सुरू करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असून शासनाकडून भविष्यात ई-बस मंगळवेढा आगाराला प्राप्त झाल्यास आणखीन चांगल्या सुविधा देता येऊ शकतील अशी परिस्थिती आहेशिवाय हुलजंती यात्रा व कार्तिकी वारीतून देखील एसटीला चांगले उत्पन्न मिळण्याची संधी आहे. आगाराचे अधिकारी व कर्मचारी प्रयत्न करीत आहेत. एस टी महामंडळाने दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर बस स्थानकाला लोकसहभागातून रंगरंगोटी करत बस स्थानकाचे रूप बदललेले आहे. भविष्यात लांब पल्ल्याच्या बसेस मधून आगाराला चांगले उत्पन्न मिळण्याची संधी आहे. महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने अध्यायावत बस मंगळवेढा आगाराला उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असल्याचे प्रवासी वर्गातून बोलले जात आहे.

# कर्णकर्कश हॉर्नचा आरोग्यावर परिणाम; ध्वनी प्रदूषणाचीही डोकेदुखी,वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष

**सोलापूर । प्रतिनिधी**

शहरातील सर्वच प्रकारच्या गाड्यांच्या कर्णकर्कश हॉर्नचा सोलापूर शहरातील नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहेत. चिडचिडेपणा वाढतो तर अनेकांना बहिरेपणा येत आहे. शहरात बहिरेपणाचे रुग्ण वाढत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. शिवाय ध्वनिप्रदूषणही मोठ्या प्रमाणावर होते. मात्र, वाहतूक पोलिस या प्रेशर हॉर्नकडे दुर्लक्ष करतात.शहरातील रस्त्यांवरुन ये - जा करताना अनावश्यक हॉर्न वाजवत भरधाव दुचाकी, चारचाकी वाहने हाकली जातात. विशेषतः यात तरुण दुचाकीधारकांचे प्रमाण जास्त आहे. तर ट्रकसह चारचाकी वाहनांचे हॉर्न जादा डेसिबलचे असतात.त्यांची मर्यादा ९३ ते ११२ पर्यंत आहे. मात्र, विशेषतः ट्रकचालक अनावश्यक खूप वेळ हॉर्न वाजवताना आढळतात. या कर्णकर्कश हॉर्नमुळे लोकांत चिडचिडेपणा वाढतो. रस्त्यावर अचानक वाजविल्या जाणाऱ्या हॉर्नमुळे अन्य वाहनधारक विचलित होतात. यातून अपघात घडण्याचा धोकाही संभवतो. कारण बाजूने जोरात हॉर्न वाजवित वाहन गेल्यास वाहनधारक विचलित होऊन त्याचा गाडीवरील ताबा सुटू शकतो.तसेच कर्णकर्कश आवाजामुळे मेंदूला त्रास झाल्याने चिडचिडेपणा वाढतो. आपल्या कामाचे नियोजन करुन घराबाहेर पडलेला वाहनधारकाला कामाच्या ठिकाणी पोचल्यावर मन एकाग्र होण्यास वेळ लागतो. परिणामी तो सहकारी, कुटुंबीयांवर चिडचिड करतो.तसेच कर्णकर्कश हॉर्नसह सायलेन्सरमध्ये बदल करुन भरधाव वाहने हाकली जातात. शहरातील वेगवेगळ्या रस्त्यांवर हे चित्र नेहमीचेच बनले आहे. त्यामुळे वाढत्या वायु प्रदुषणाच्या यादीत असलेल्या सोलापूर शहरातील ध्वनिप्रदूषणातही भर पडत आहे. शिवाय वाहनधारक व नागरिक बहिरेपणाचे शिकार होत आहेत. बहिरेपणाच्या रुग्णसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे तज्ज्ञांकडून सांगण्यात येत



आहे.मात्र, चौका-चौकात वाहतूक शिस्तीसाठी उभे वाहतूक पोलिस वाहने अडविण्यातच धन्यता मानतात. विनाकारण हॉर्न वाजवल्यास, मनाई भागात हॉर्न वाजवल्यास दंड आणि मल्टी साउंड, प्रेशर हॉर्न बसविल्यास व वाजविल्यास वाहनमालक आणि चालक अशा दोघांवर दंडात्मक कारवाईची मोटार वाहन कायद्यात तरतूद आहे. परंतु, वाहतूक पोलिस कर्णकर्कश हॉर्नसह सायलेन्सरमध्ये बदल करुन भरधाव वाहन हाकणाऱ्यांकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे त्याची अंमलबजावणी करण्यात पोलिस पुढाकार घेत नसल्याचेच दिसते.दोन दिवसांपूर्वी सात रस्ता - गांधीनगर रस्त्यावर वाहतूक पोलिसांनी दुचाकीच्या सायलेन्सरमध्ये बदल करुन आवाज करत गाडी हाकणाऱ्या एका २२ वर्षीय तरुणावर कारवाई केली. मात्र, अशा घटना नित्याच्याच बनल्या असताना वाहतूक पोलिस त्याकडे लक्ष देताना दिसत नाहीत. अशा कारवाया सातत्याने होणे आवश्यक आहे. गाड्यांच्या कर्णकर्कश आवाजावर नियंत्रण यायलच हवे.वाहनांवरील हॉर्नच्या कर्णकर्कश आवाजामुळे अन्य वाहनधारक विचलित होतो. मेंदूला त्रास होऊन त्यांच्यात चिडचिडेपणा वाढतो. कामाच्या ठिकाणी मन एकाग्र होत नाही. त्यामुळे सहकाऱ्यांवर चिडतो. दिवसभरातील कामाच्या कोलाहलातून घरी परतताना हॉर्नचा कर्णकर्कश आवाज ऐकल्यास कुटुंबियांवर रागराग करतो. यातून तो आक्रमक होतो. विशेषतः ही बाब ट्रकचालकांमध्ये आढळते. कारण सतत कर्णकर्कश आवाजामुळे ते कोणाचे काही ऐकण्याच्या मनस्थितीत नसतात, हे अनेक घटनांमधून दिसून येते.

# १२ वर्षांपासून 'त्या' युवकांची प्रबोधनात्मक दिवाळी

## फटाकेमुक्त दिवाळी : बिबी येथील सेवार्थ गृपचा अनोखा संकल्प

**चंद्रपूर । प्रतिनिधी**



१२ वर्षापुर्वी सातवी-आठवीत शिकणारी मुले एकत्र आली. फटाक्यांची आतषबाजी करण्याऐवजी दिवाळी ही सामाजिक उपक्रमाने साजरी करण्याचा संकल्प केला. आपल्या आजूबाजूला असणारा केरकचरा बघून स्वच्छता मोहीम राबवली. सेवार्थ गृपची स्थापना करुन लाखो अस्थिरुग्णांवर मोफत उपचार बरे करणारे गावातील सुप्रसिद्ध समाजसेवक डॉ.गिरीधर काळे यांच्या सेवेने प्रभावित होवून दरवर्षी मागील १२ वर्षांपासून दिवाळी ही सामाजिक-वैचारिक व प्रबोधनात्मक लोकजागराने साजरी करत आहे. गावात दिवाळीनिमित्त स्वच्छता मोहीम, व्यसनमुक्ती, गावातील गुणवंत व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-यांचा सत्कार, पथनाट्य व प्रबोधनात्मक कार्यक्रमातून जनजागृती केली. दिव्य ग्राम महोत्सव आयोजित करुन राज्यातील सामाजिक क्षेत्रात योगदान देणा-यांना प्रतिष्ठेचा जीवन गौरव पुरस्कार व नव्या पिढीतील आश्वासक सामाजिक कार्यकर्त्यांना सेवार्थ पुरस्कार सुरु केला. यात रॅमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त समाजसेवक, पद्मश्री डॉ.प्रकाश व मंदाकिनी आमटे, राष्ट्रीय प्रबोधनकार सत्यपाल महाराज, प्रश्नचिन्हचे मतीन भोसले, लेखामेंढा येथील सामाजिक कार्यकर्ते देवाजी तोफा, पुणे येथील मानवाधिकार कार्यकर्ते ड.असीम सरोदे, आदर्श ग्राम राजगडचे चंदू पाटील मारकवार, राष्ट्रीय युवा पुरस्कार विजेते, इको-प्रोचे बंडू धोत्रे, अपंगांसाठी कार्य करणा-या ज्ञानार्चना संस्थेच्या अर्चना मानलवार, ३६५ दिवस शाळा चालवणारे आदर्श शिक्षक राजेंद्र प्रतेकी, माऊंट एव्हरेस्ट सर करणारे जिल्ह्यातील आदिवासी तरुण यांना सन्मानित करुन त्यांचे मार्गदर्शन व विचारांनी गावाला प्रबोधनातून दिशा दिली.

**या युवकांचा पुढाकार ठरतोय प्रेरणादायी**


बिबी येथील कवी व सामाजिक कार्यकर्ते अविनाश पोईनकर, विठ्ठल अहिरकर, संदिप पिंगे, गणपत तुम्हाणे, विशाल अहिरकर, अनिल हिंगाणे, महेश नाकाडे, निलेश पानघाटे, इराणा तुम्हाणे, गोपाल मडावी, चंपत तुम्हाणे, आकाश चटपल्लीवार, शुभम डाखरे, संतोष बावणे, गणपत मडकाम, सुरज मडावी, महेश राठोड आदी युवकांचा पुढाकार प्रेरणादायी ठरला. गावातील शिवजयंती महोत्सव समीती, सेव्हन स्टार गृप व सर्व मंडळे व गावकऱ्यांचे मिळत असलेल्या सहकार्याने हा उपक्रम जिल्हा व राज्यात महत्त्वपुर्ण ठरला आहे.

# 'त्या' गटाचे वकील बाबांना सॉरी म्हणतात-सुप्रिया सुळे



**बारामती-** 'त्या' गटाचे वकिल शरद पवारांना भेटले की सॉरी म्हणतात. दोन्ही बाजूचे वकील माझे दोस्त आहेत, असे म्हणत सुप्रिया सुळे यांनी अजित पवार गटाला टोला लगावला. एनसीपीमध्ये फूट पाडल्यानंतर चिन्ह आणि पक्षाची लढाई सुरु झाली. अद्यापही निवडणूक आयोगात ही सुनावणी सुरु आहे. तर दोन्ही गटाने कोर्टाची पायरी चढली आहे. अशावेळी सुप्रिया सुळे यांनी बारामतीत लोकांशी संवाद साधताना अजित गटाला टोल लगावत लढाई जिंकणारच असा निर्धार व्यक्त केला.'हम जितेंगे ये बाद मे देखेंने मगर लढेंगे जरुर', असा विश्वास सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केलाय. काही दिवसांपूर्वी प्रतापराव पवार यांच्या घरी शरद पवार आणि अजित पवार यांची भेट झाली. त्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना एकच उधाण आलं. त्याचप्रमाणे आता दोन्ही गटातील वकिल हे माझे मित्र आहेत, असं वक्तव्य सुप्रिया सुळे यांनी केलंय. त्यामुळे पुन्हा एकदा राजकीय वर्तुळातील चर्चांना उधाण आलंय.कोर्टाची पायरी आता चढलोच आहोत तर उतरायची नाही. जेव्हा आपण खरे असतो तेव्हा लढायची आणि निकालाची भीती वाटत नाही कारण आपण खरे असतो. निवडणूक आयोग कधी निकाल देईल माहिती नाही. पण वकिलांबरोबर आता राहायची सवय झालीय. बरेच दिवस वकील नाही भेटले तर कसं तरी वाटतं. दोन्ही बाजूचे वकील माझे दोस्त आहेत. त्यामुळे मी चहा एका बरोबर घेते आणि जेवण एका बरोबर करते. त्यामुळे लोक म्हणतात की हे काय चाललंय, पण मी त्यांना प्रेमाने म्हणते आपली दोस्ती एका बाजूला आणि लढाई एका बाजूला. वकील देखील शरद पवारांना भेटल्यानंतर सॉरी म्हणतात, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.मतदार संघातील कामाचा अर्धा वेळ हा केस लढवण्यात जातो. त्यामुळे आता नवऱ्याला आणि मुलाबाळांना सांगितले की, आता ११ महिने बाय म्हटलं. त्यांना मी आता म्हटलंय की मला फक्त टिव्हीवरच बघा. मतदार संघातील कामे बघायची की कोर्टाच्या केसेस बघायच्या असा सवाल सुप्रिया सुळे यांनी यावेळी उपस्थित केला.पुढे बोलताना त्यांनी म्हटलं की, मी कोर्टात ८० वर्षाच्या वडिलांना एकटं जाऊन देईल का? पण आता न्यायालयीन लढा लढायला आता मज्जा यायला लागलीये. तिथले एक वकिल हे सदानंदचे मित्र आहेत ते देखील मला येऊन भेटतात. माझा बराचसा वेळ हा या कामात जातो. त्यामुळे मतदारांनी मला समजून घ्या. तुमच्या मतदार संघातून मी गायब झालेले नाही, अशी मिश्किल टिप्पणी त्यांनी केलीये.सध्या राष्ट्रवादीची लढाई निवडणूक आयोगात सुरु आहे. याबाबत निकाल अद्याप लागायचा आहे. निवडणूक आयोगातील पहिल्या सुनावणीसाठी स्वत: शरद पवार हे देखील उपस्थित राहिले होते. त्यामुळे आता राष्ट्रवादी पक्षाचा आणि चिन्हाचा निकाल नेमका काय लागणार हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.

# आपल्या लाडक्या पत्नीला दिली १० कोटीची हि गाडी दिवाळी भेट



**मुंबई** -आणि देशातील प्रसिद्ध उद्योगपती मुकेश अंबानी यांना झेड प्लस सुरक्षा आहे. जेव्हा त्यांचा ताफा निघतो तेव्हा लग्झरी कार दिसतात. अंबानी यांच्या कार कलेक्शनमध्ये अल्ट्रा लग्झरी कारचा समावेश आहे. या कारचा ताफा जेव्हा निघतो, तेव्हा अनेकांचे डोळे दिपून जातात. जगातील सर्वात महागडी कार रोल्स रॉयसचाही अंबानी यांच्या ताफ्यात समावेश आहे. आता अंबानी यांच्या घरी आणखी एका रोल्स रॉयस कारचा समावेश झाला आहे. मुकेश अंबानी यांनी त्यांची पत्नी नीता अंबानी यांना दिवाळी निमित्ताने Rolls Royce Cullinan डणत ही कार गिफ्ट म्हणून दिली आहे. आजवरचं हे दिवाळीतील सर्वात महागडं गिफ्ट तर आहेच, पण देशातीलही हे सर्वात महागडं गिफ्ट आहे.

दिवाळी निमित्त देशातील सर्वात श्रीमंत व्यक्तीच्या सर्वात श्रीमंत पत्नीला सर्वात महागडी कार मिळाली आहे. मुकेश अंबानी यांनी पत्नी नीता अंबानी यांना रोल्स रॉयस कलिनन कारचा ब्लॅक बॅज एडिशन एसयूव्ही गिफ्ट म्हणून दिला आहे. ही सर्वात महागडी आणि यूनिक कार मानली जाते. मुकेश अंबानी यांनी नीता यांना दिलेली ही कार एक दोन कोटींची नाहीये. रोल्स रॉयस कार तिच्या किंमतीसाठीही प्रसिद्ध आहे. नीता यांना गिफ्ट मिळालेल्या या कारची किंमत १० कोटी एवढी आहे.कारचे पाच खास फिचर्स रोल्स रॉयस कस्टमर्सला कस्टमायजेशनची सुविधा आहे. तुम्ही तुमच्या आवडीनुसार या कारमध्ये अनेक बदल करू शकता. अल्ट्रा लग्झरी एसयूव्ही कार ६.७५ लीटर ट्विन टर्बो त१२ इंजिन पॉवर लेन्स आहे. या कारचा ८ स्पीड ऑटोमैटिक गिअरबॉक्स चारही चाकांपर्यंत पॉवर देते.सामान्य कलिनन कारच्या तुलनेत ब्लॅक बॅज एडिशनचे एक्स्टीरिअर ग्लॉस ब्लॅक हायलाईट्सह मिळतो. यात आयकॉनिक "Spirit of Ecstasy' सुद्धा आहे. त्यामुळे कारला अधिक चांगला ग्रँड प्रिंजेस मिळतो.स्टँडर्ड कलिननमध्ये ५७१ झडच्या मॅक्सिमम पॉवरचा दावा केला जातो. तर कलिनन ब्लॅक बॅजचा मॅक्सिमम पॉवर आऊटपूट ६०० झड आहे. एवढेच नव्हे तर मॅक्सिमम टॉर्क आऊटपूट सुद्धा स्टँडर्ड ८५० छा वरून कलिनन ब्लॅक बॅजमध्ये ९०० छा देण्यात आला आहे. तसा दावाच करण्यात आला आहे.कलिनन ब्लॅक बॅज प्रचंड वेगाने धावते. या अल्ट्रा लग्झरी कारची टॉप स्पीड ताशी २५० किलोमीटर इतका आहे.जगातील सर्वात बेस्ट कारमध्ये प्रीमियम एसयूव्ही असल्याचं मानलं जातं. कलिनन ब्लॅक बॅजमध्ये इंटेरियरमध्ये काही एलिमेंट्स कार्बन फायबरमध्ये तयार करण्यात आले आहेत. लेदर अपहोल्स्ट्री ब्लॅक कलर स्कीमवर आधारीत आहे.अंबानी कुटुंब भारतातील सर्वात श्रीमंत कुटुंब आहे. त्यांचं अंटालिया हे अलिशान घर १५००० कोटींचं असून या घरात गॅरेजही आहे. या गॅरेजमध्ये जगभरातील कारचा समावेश आहे.

# राज्यात पुढील २४ तासांत अवकाळी बरसणार

**मुंबई-** राज्यात मागील काही दिवसांपासून पावसाने हजेरी लावली आहे. त्यात आता पुढील २४ तासांत पुन्हा पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने राज्यासह देशात ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. राज्यात थंडीची तीव्रता वाढली असून नोव्हेंबरच्या शेवटी थंडीचा जोर वाढणार असल्याचा अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यातच आज रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाची शक्यता असल्याचा अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे.देशात दिवसाळी साजरी होत असताना अनेक जिल्ह्यात पावसाने हजेरी लावल्याने अनेकांना त्याचा त्रास सहन करावा लागला आहे. पुढील २४ तासात देखील राज्यातील अनेक भागात पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यामध्ये रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांचा समावेश आहे. मुंबईसह, पुणे, सातारा आणि कोकण किनारपट्टी भागात काही ठिकाणी रविवारी पाऊस झाला आहे. तर काही भागात ढगाळ वातावरण पाहायला मिळाले. असे असलेतरी दुपारी मात्र उन्हाचा चटका बसत होता. त्यामुळे राज्यातील वातावरणात सतत बदल होत असल्याचे पाहायला मिळत आहे.भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार राज्यातील काही भागात पाऊस आणि वादळाची शक्यता आहे. पश्चिम हिमालयीन भागात झालेल्या बर्फवृष्टीमुळे वातावरणात बदल झाला आहे. त्यामुळे देशातील अनेक राज्यांमध्ये थंडीचा कडाका वाढला आहे. राज्यातही तापमानात थोडी घट नोंदवण्यात आली आहे. पुढील काळात यात आणखी घट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.पश्चिम - मध्य अरबी समुद्रात चक्राकार वाऱ्यांची स्थिती कायम आहे. बंगालच्या उपसागरात थायलंडच्या आखातामध्ये चक्राकार वाऱ्यांची स्थिती तयार झाली आहे. त्यामुळे उद्या कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याचे संकेत आहेत. पश्चिमेकडे सरकताना या प्रणालीची तीव्रता वाढणार आहे. राज्यातील ढगाळ हवामान निवळताच कमाल तापमानात वाढ झाली असून, किमान तापमानाचा पारा कमी होऊ लागला आहे. किमान तापमानात घट झाल्याने निफाड येथील गहू संशोधन केंद्रात राज्यातील नीचांकी १५.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. त्यामुळे राज्याच्या किमान तापमानात घट होण्याची शक्यता वर्तवण्यात आहे.

# अल्ट्राटेक सिमेंट कंपनी विरोधात दत्तक गावातील १० सरपंचासह गावकरी एकवटले

**कोरपना । प्रतिनिधी**



अल्ट्राटेकच्या आर्थिक उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून त्याप्रमाणात कंपनी विकास कामावर खर्च करत नसल्याचे दिसून येते. सामाजिक ऋण निधी म्हणून कंपनीला उत्पन्नावरील दोन टक्के रक्कम दत्तक गावांच्या विकास कामांवर खर्च करावे लागतात. मात्र कंपनी मनमानीने वागत असून त्यामुळे दत्तक गावातील विकास कामांवर विपरीत परिणाम झाला आहे. या मनमानीच्या विरोधात व विविध लोकोपयोगी मागण्या घेऊन आज (दि. १३) पासून अल्ट्राटेक सिमेंट कंपनी विरोधात दत्तक गावातील सरपंच संघटनेचे धरणे आंदोलन व बेमुदत साखळी उपोषणाला सुरुवात केली आहे. प्रदूषण विषयक समस्येमुळे परिसरातील नागरिकांना विविध रोगाची लागण झाली आहे. कोरपना तालुक्यातील अल्ट्राटेक सिमेंट कंपनी, आवारपूर अंतर्गत येत असलेल्या नांदा, बिबी, आवारपूर, हिरापूर, सांगोडा, नोकारी, पालगाव, तळोधी, बाखर्डी व भोयेगाव अशा १० दत्तक गावातील ग्रामपंचायतीच्या सरपंच, उपसरपंच व सदस्यांनी कंपनी विरोधात धरणे आंदोलन व बेमुदत साखळी उपोषण सुरू केले आहे. कंपनीच्या सामाजिक ऋण (सीएसआर) निधीमधून ग्रामपंचायतींना पाहिजे त्याप्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येत नसल्याचा फटका ग्रामविकासाला बसत आहे. सोबतच ग्रामपंचायत प्रशासनाला विश्वासात न घेता निधी परस्पर खर्च केला जात असल्याचा आरोप सरपंच संघटनेचा आहे. कंत्राटी कामगारांचया बोनसमध्ये वाढ करावी, स्थानिक बेरोजगारांना रोजगार द्यावा, कंपनीने माणिकगड येथे होणारी लाईमस्टोनची वाहतूक तात्काळ थांबवावी, आय.टी.आय. झालेल्या स्थानिक विद्यार्थ्यांची अप्रेंटिस भरती करावी. टाकाऊ खनिज वापरून गाव शिवारातील पाणंद रस्त्याची दुरुस्ती कंपनीमार्फत करण्यात यावी. इतर राज्यातील शिक्षित युवकांना आणून कारखान्याच्या माध्यमातून प्रशिक्षित केल्या जाते. मात्र दत्तक घेतलेल्या गावांमध्ये अनेक युवक सुशिक्षित आहे. अशा प्रशिक्षण झालेल्या युवकांना कुवतीनुसार कामावर घेण्यात यावे. वाढते प्रदूषण बंद करावे. दिवसेंदिवस कारखान्याच्या माध्यमातून वाढत्या प्रदूषणामुळे आजूबाजूच्या दत्तक गावामध्ये राहणाऱ्या अनेक नागरिकांना कॅन्सर, अपेंडिक्स, हर्निया, त्वचेचे रोग असे विविध आजार होत आहे. यामुळे अनेकांना जीव सुद्धा गमवावे लागले. ही समस्या त्वरित निकाली काढावी सीएसआर फंडच्या नावाखाली कंपनी इतर जिल्ह्यातील अनेक प्रतिष्ठानांना व अधिकारी लोकांना यातील फंडाचा हिस्सा वाटप करीत असल्याचा आरोप सरपंचांनी केला आहे.

**प्रभावित क्षेत्रांना खनिज विकास निधी मिळावा**

**कोरपना तालुका औद्योगिक क्षेत्र असून या तालुक्यातून मोठ्या प्रमाणात खनिजाचे उत्खनन होते. मात्र खनिज विकास निधी येथील ग्रामपंचायतींना मिळत नसल्याचा आरोप सरपंचांनी केला आहे. गेल्या पंचवीस-तीस वर्षात काही गावात खनिज विकास निधी शून्य असून या विरोधात सरपंचांनी रोष व्यक्त केला. तसेच जल, वायू, ध्वनी प्रदूषण औद्योगिक क्षेत्रातील नागरिकांनी सहन करायचे आणि निधी मात्र बाहेर क्षेत्रात वळवला जातो. जिल्हाधिकाऱ्याच्या या धोरणाचा सुद्धा सरपंचांनी निषेध केला.**

**या आंदोलनाला अखिल भारतीय सरपंच परिषदेचा पाठिंबा असून जिल्ह्यातील ९०० ग्रामपंचायतींमध्ये सरपंच गावकऱ्यांसह अल्ट्राटेक सिमेंट कंपनीचा निषेध करणार आहे.**
**- नंदू वाढई, महासचिव, अखिल भारतीय सरपंच परिषद, विदर्भ प्रांत**

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .